महाराष्ट्र विधानसभा

दुसरे अधिवेशन, २०१६

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

कोल्हापूर येथील जातपडताळणी कार्यालयात लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने पोलिस निरिक्षकास अटक केल्याबाबत

(१) १०७३ (२२-१२-२०१४). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील जातपडताळणी कार्यालयात माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दुस-या आठवडयात लाचलूचपत प्रतिबंधक विभागाने पोलिस निरिक्षक दिलीप बामणे यांना अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) : (१), (२) व (३) दि. १०.११.२०१४ रोजी फिर्यादी श्री.सचिन बाळासाहेब जंगम यांचेकडून रु. १०,०००/- ची लाच स्विकारल्या प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री.दिलीप धोंडीराम बामणे, पोलीस निरीक्षक, विभागीय जाती प्रमाणपत्र समिती क्र.२ कोल्हापूर यांचेविरुध्द आष्टा पोलीस ठाणे भाग-६ (जि.सांगली) येथे गुन्हा रजिष्टर क्रमांक २६/२०१४, लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियम १९८८ कलम ७, १३(१)(ड) सह १३ (२) अन्वये दिनांक ११.११.२०१४ रोजी गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली. मा.न्यायालयाने त्यांना दिनांक २५.११.२०१४ पर्यंत न्यायालयीन कोठडी मंजूर करुन त्यांची जामीनावर मुक्तता केली आहे.

सदर प्रकरणी आरोपी लोकसेवक श्री.दिलीप धोंडीराम बामणे यांना दि. ११ नोव्हेंबर, २०१४ पासून शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.

आरोपी विरुध्द मा.न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्यास सक्षम प्राधिकारी यांची मान्यता देणेसंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

शाहूवाडी (जि. कोल्हापूर) तालुक्यातील पोलिस इमारतीच्या प्रस्तावाबाबत

(२) १५११ (१५-०१-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहूवाडी तालुक्यातील पोलिस इमारतीचा प्रस्ताव शासनाने सन २००७ मध्ये मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाला शासनाने आर्थिक तरतुद केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पोलिस अधिकारी कर्मचा-यांना जुन्या इमारतीमध्ये अनेक समस्यांना सामोरे जावे लागते, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने इमारत बांधकामासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत.

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) : (१) व (२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) शाहुवाडी पोलीस ठाण्याची इमारत जुनी झालेली असल्याने नवीन पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी रुपये २० लक्ष इतका निधी सार्वजनिक बांधकाम विभागास वितरीत करण्यात आला आहे. या पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी नवीन दरसूचीवर आधारीत खर्चाच्या अंदाजपत्रकासह प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात घरफोडीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

(३) २८९४ (१५-०१-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड तालुक्यात (जि.रायगड) घरफोडीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असून यासंदर्भात पोलिस ठाण्यात तक्रारी करुनही महाड शहर पोलिसांना एकाही घरफोडी, चेन स्नॅचिंग चोरीला तपास अद्याप लागलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाड शहर पोलिस ठाण्यात झाले अन्य गुन्ह्यांच्या नोंदीनुसार शहर आणि परिसरात चोरी झालेल्या प्रत्यक्ष घटनांच्या नोंदी दिसूनच येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) तद्नुसार कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) हे खरे नाही. महाड शहर पोलीस ठाणेमध्ये गत तीन वर्षामध्ये घरफोडीचे एकूण १० गुन्हे दाखल असून त्यापैकी ३ गुन्ह्याचे 'अ' वर्ग समरी मंजूरी करण्यात आलेली आहे. तसेच ४ गुन्हे न्यायप्रविष्ठ व ३ गुन्हे पोलीस तपासावर आहे.

जबरी चोरी (चैन स्नॅचिंग) गुन्ह्याबाबत गत तीन वर्षामध्ये एक गुन्हा दाखल असून सदरच्या गुन्ह्याची 'अ' वर्ग समरी मंजूर करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) हे खरे नाही. महाड शहर पोलीस ठाणे हद्दीत गुन्हे घडतात त्याची नोंद पोलीस ठाणे दप्तरी घेतली जाते व त्याचा तपास केला जातो.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात जात पंचायतीच्या दहशतीच्या अनेक घटना घडत असल्याबाबत

(४) ५८७४ (१५-०५-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जात पंचायतीच्या दहशतीच्या अनेक घटना घडत असून त्यांचे अमानुष न्याय निवाडे व शिक्षेच्या फतव्यांमुळे पिडीत कुटुंबातील व्यक्तीना जीवास मुकावे लागत आहे तर काहीना जात बहिष्कृत केले जात असून त्यांच्यावर अन्याय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जातपंचायती संविधान विरुध्द असून त्यांच्या मनमानी कारवाई विरुध्द कायदा बनविण्यासाठी शासन काही पाऊले उचलणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१६) : (१) जात पंचायतीच्या दहशतीच्या घटनासंदर्भात सन २०१५ मध्ये २१ गुन्हे दाखल आहेत. अमानुष न्यायनिवाडे व शिक्षेच्या फतव्यामुळे पिडीत कुटुंबातील व्यक्तींना जीवास मुकावे लागल्याबाबत सन २०१५ मध्ये घटना घडलेली नाही.

(२) राज्यात बहिष्कार/वाळीत टाकणे ही अनिष्ट सामाजिक प्रथा अद्यापि सुरु असल्याने कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्तींच समूह यांच्याकडून समाजाच्या कोणत्याही सदस्यांवर बहिष्कार घालणे या कृतीला आळा बसावा म्हणून महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार बंदी कायदा बनविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) या कायद्यांतर्गत बहिष्कार टाकणे ही कृती गुन्हा ठरविण्यात आली असून सदर गुन्ह्यासाठी ३ वर्षापर्यंत कारावास व ५ लाखापर्यंत दंड किंवा दोन्ही शिक्षा अशी तरतुद प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील सोई-सुविधांपासून वंचित असलेल्या गरिबांच्या झोपडपट्टया अधिकृत म्हणून घोषित केल्या जात नसल्याबाबत

(५) ८२३९ (०६-०७-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वर्षानुवर्षे दारिद्रयात खितपत पडलेल्या आणि सोई-सुविधांपासून वंचित असलेल्या गरिबांच्या झोपडपट्टया अधिकृत म्हणून घोषित केल्या जात नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, योजनेच्या पात्रतेसाठी बनावट लाभार्थी करण्यापासून ते झोपडीधारकांना वेगवेगळया प्रकारचे आमिष दाखवून फसवणूक करण्याचे प्रकार घडत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विकासकाकडून होणारी फसवणूक, दादागिरी चुकीच्या पध्दतीने होणारी इमारतींची कामे, एसआरए प्रशासन, पोलिसांनी दाद न देणे, यामुळे झोपडपट्टीधारकांना वारंवार न्यायालयाचे दरवाजे ठोठावे लागतात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, रेल्वे व संरक्षण विभागाच्या जागेवर योजना राबविण्यासाठी राज्य शासनाच्या केंद्र सरकारशी पुरेशा प्रमाणात संवाद झालेला नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२४-०२-२०१६) : (१) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्वकिास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(४) नुसार संरक्षित झोपडीसाठीचा दि. ०१.०१.२०१५ हा पात्रता दिनांक, शासन अधिसूचना, गृहनिर्माण विभाग दि. ०२.०५.२०१४ अन्वये दि. ०१.०१.२००० असा करण्यात आलेला आहे. तसेच झापेडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र यांनी त्यांच्या दिनांक १०.०२.२०१४ च्या आदेशान्वये महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ मधील कलम ३(क) अन्वये एकत्रितरित्या आदेश पारित केलेले असून त्यानुसार पुणे शहरातील घोषीत व गणनाकृत झोपडपट्यांचे क्षेत्र हे झोपडपटृटी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आलेले आहे.

(२) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग दि. १६.०५.२०१५ अन्वये झोपडी दि. ०१.०१.२००० अथवा त्यापूर्वीपासूनची संरक्षणपात्र असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणाऱ्या झोपडपट्टीवासियांचा निवारा निश्चित करण्याबाबतची कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) गृहनिर्माण व नागरी गरिबी उच्चांटन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दि. २५.०६.२०१५ च्या कार्यालयीन आदेशान्वये २०२२ पर्यंत सार्वासाठी घरे अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या जागेवरीलही झापेडपट्टयांचे संदर्भात धोरण जाहिर केलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

चंदगड (जि.कोल्हापूर) येथे पोलिसांसाठी असलेल्या वसाहतीची दुरावस्था झाल्याबाबत

(६) ८७७० (०६-०७-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) येथे पोलिसांसाठी असलेल्या वसाहतीची दुरावस्था झाली असून निवासस्थाने कमी पडत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसाहतीची दुरवस्था सुधारणेबाबत व पुरेश्या प्रमाणात घरे बांधण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) व (३) चंदगड, जि.कोल्हापूर येथील पोलीस ठाण्यातील अधिका-यांकरीता १ निवासस्थान व पोलीस कर्मचाऱ्यांकरीता सदरची निवासस्थानांनी दुरुस्ती करण्याबाबतचा प्रस्ताव व अंदाजपत्रके सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मागविण्यात आले असून पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे शहरात नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती करण्याबाबत

(७) ९३८५ (०४-०४-२०१५). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरातील माजिवडा, वर्तकनगर, कापूरबावडी व कासारवडवली येथील पोलिस स्टेशन वाढत्या लोकसंख्येमुळे कमी पडत असल्याने कायदा व सुरक्षिततेच्या दृष्टीने चितळसर, मानपाडा गट क्र. ५९ अ, हिस्सा नं ११ ब /२/२ क्षेत्र २१४० चौथी क्षेत्रफळाच्या आरक्षित भूखंडावर नवीन पोलीस ठाण्याची निर्मिती करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ डिसेंबर, २०१४ रोजी पत्रान्वये केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) वर्तकनगर, कापूरबावडी व कासारवडवली पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन चितळसर मानपाडा पोलीस ठाणे आणि महात्मा फुले चौक व बाजारपेठ पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन खडकपाडा पोलीस ठाणे निर्माण करण्यात आले आहे.

चितळसर मानपाडा पोलीस ठाण्याकरीता ठाणे महानगरपालिका हद्दीतील सेक्टर क्र. ४ मधील गट क्र. ६९ अ हिस्सा ४ या गटामध्ये पोलीस स्टेशन आरक्षण क्र. ३ च्या क्षेत्रापैकी मंजूर विकास प्रस्ताव क्र. २००२/६७ अंतर्गत गट नं. ५९ अ, ३०/०२/२ व गट नं ६९/४ मधील १४९३.४६८ चौ.मीटर क्षेत्राच्या मोकळ्या जागेचा ताबा विनामुल्य देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पिंपरी महापालिकेच्या हद्दतील वाय.सी.एस. रुग्णालयात दगावलेल्या रुग्णांनचे व्हिसेरा महिनोमहिने पडुन राहत असल्याबाबत

(८) १४१८८ (०७-०४-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी महापालिकेच्या हद्दीतील वाय.सी.एस. रुग्णालयात दगावलेल्या रुग्णांना मृत्युचे कारण समजवण्यासाठी काढून ठेवलेला व्हिसेरा महिनोमहिने पडुन राहत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लॅस्टिक बरणीमध्ये ठेवलेला व्हिसेरा घुस, उंदीर फस्त करीत असून त्यामुळे रुग्णालयात संसर्गाची भिती निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच काही व्हिसेरा प्लॅस्टीक पिशवित ठेवण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) : (१) व (२) नाही.

(३) हे खरे नाही.

व्हिसेरा हे प्लॅस्टिक बरणी काचेची बरणी तसेच स्टिलचे डब्यामध्ये ठेवले जातात.

(४) दि. २९/१२/२०१० ते दि. ०७/११/२०१२ या कालावधीतील वायसीएम हॉस्पीटल, पिंपरी चिंचवड, पुणे येथे शवविच्छेदन विभागात असलेले पुणे ग्रामीण कार्यक्षेत्रातील सर्व प्रलंबित व्हिसरांची निर्गती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पोलिसांच्या गृहनिर्माण प्रकल्पाबाबत

(९) १६५७८ (१२-०८-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पोलिसांच्या मालकीचे असलेल्या भूखंडावर प्रस्तावित गृहनिर्माण धोरणात पोलिसांना घरांसाठी चार इतके चटई क्षेत्र उपलब्ध करुन देताना त्यापैकी ४५ टक्के वाटा

सामान्यांच्या घरांसाठी देण्याच्या तरतूदीला महाराष्ट्र पोलिस गृहनिर्माण मंडळाने विरोध दर्शविल्याचे माहे मे, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याची क्षमता असतांना पोलिसांच्या मालकीच्या भुखंडाच्या विकासासाठी म्हाडासोबत संयुक्त भागीदारी नको असे ही स्पष्ट केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने भूमिका स्पष्ट करुन पोलिसांच्या गृहनिर्माण प्रकल्पाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्र शासनाने राज्यातील बहुतांश योजनाना अनुदान बंद केल्याबाबत

(१०) १७१५८ (१०-०८-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने राज्यातील बहुतांश योजनांचे अनुदान बंद केल्याने राज्यातील शेकडो कंत्राटी कर्मचाऱ्यांचे वेतन थकले आहे व संबंधित योजना बंद होणार असल्याने त्यांच्या नोकऱ्याही संकटात आल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या कंत्राटी सेवेत काम करणाऱ्या या युवकांना पुढे इतरही ठिकाणी नोकऱ्या मिळत नाहीत हे पाहता शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२३-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

केंद्र शासनाने योजनांचे अनुदान बंद केल्यामुळे कंत्राटी कामगारांचे वेतन थकले आहे व त्यांच्या नोकऱ्या संकटात आल्या आहेत अशा आशयाचे कोणतेही निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भ्वत नाही.

हिंगोली जिल्ह्यातील कुरूंदा, कळकनूरी, वासंबा, हट्टा, बसमत, आखाडा, बाळापूर येथील पोलिस ठाण्याच्या इमारती बांधणेबाबत

(११) १७४५३ (१२-०८-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यातील कुरूंदा, कळकनूरी, वासंबा, हट्टा, बसमत, आखाडा, बाळापूर येथील पोलिस ठाण्याच्या इमारती बांधणे आवश्यक असताना जिल्हा पोलीस प्रशासनाने या पोलिस ठाण्याच्या इमारतींचे प्रस्तावही शासनाकडे सादर केले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पोलिस ठाण्यांच्या नविन इमारतींच्या प्रस्तावाला मंजूरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०१-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२) पोलीस अधीक्षक, हिंगोली जिल्हा आस्थापनेवरील कुरुंदा, कळमनुरी, बासंबा, हट्टा, बसमत, आखाडा बाळापूर या पोलीस स्टेशनच्या बांधकामासाठी सुधारीत दरसूचीवर आधारीत बांधकामाचे अंदाजपत्रक प्राप्त करण्यात येत असून, निधीची उपलब्धता विचारात घेवून प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई शहरात वाहन चोरीच्या घटना वाढत असल्याबाबत

(१२) १७५२४ (१२-०८-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मागील तीन महिन्यांत म्हणजे ९० दिवसात ७४३ वाहनांची चोरी झाली असून त्यात फक्त १०२ वाहने सापडली असल्याने मुंबई शहरात वाहनचोरीचे प्रमाणात वाढ झाली असल्याचे दिनांक २ मे, २०१५ रोजीच्या सुमारास उजेडात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाहनचोरीच्या घटना व त्या परत मिळण्याचे प्रमाणे अतिशय गंभीर असून वाहनचोरी विरोधात विशेष मोहीम राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, उक्त प्रकरणी कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) : (१) हे खरे आहे
(२) मुंबई शहरातील सर्व पोलीय ठाणे हद्दीत दिवस व रात्री अचानकपणे नाकाबंदी आयोजित करुन वाहनांची तपासणी केली जाते संशयीत वाहन तसेच व्यक्ती मिळाल्यास त्यांची चौकशी करुन खात्री झाल्यावर त्यांच्यावर योग्य कारवाई केली जाते. तसेच मुंबई शहराबाहेर जाणारे व येणारे रस्त्यावर महत्वाच्या ठिकाणी तसेच रेल्वे स्टेशनच्या बाहेरील पार्कींग, गर्दीच्या ठिकांना जवळील पार्कींग, ब्रीज खालील पार्कींग, मॉल, बिजनेस पार्क व इत्यादी ठिकाणच्या पार्कींगमध्ये पोलीस अधिकारी व अंमलदार हे गस्तींच्या दरम्यान वाहनांची तपासणी करतात. तसेच मुंबईतील महानगरपालिका डंपिंग यार्ड येथे बेवारस ताब्यात घेतलेल्या वाहनांची तपासणी केली जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

अनसुर्डा (जि.उस्मानाबाद) येथे स्थानिक दलितांवर ग्रामस्थांनी सामाजिक बहिष्कार टाकून मुलभूत सुविधा नाकारल्याबाबत

(१३) १७८९८ (१२-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अनसुर्डा (जि.उस्मानाबाद) गावात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीत भीमगीत लावले म्हणून तेथील स्थानिक दलितांवर ग्रामस्थांनी सामाजिक बहिष्कार टाकून मुलभूत सुविधा नाकारल्याप्रकरणी जिल्हाधिकारी, तहसीलदार यांचेकडे दिनांक ७ मे, २०१५ रोजी तसेच वारंवार तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१६) : (१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या मिरणूकीत लावलेले डिजीटल फोटो पायाजवळील बाजूस फाडल्यावरुन गावात जातीय तणाव निर्माण झाला होता. बहिष्कारासारख्या प्रकार झाला नसून येथील मुलभूत सुविधा नाकरल्या प्रकरणी जिल्हाधिकारी, तहसिलदार यांचेकडे निवेदन/तक्रारी दिलेल्या आहेत.
(२) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, बेंबळी ता.जि.उस्मानाबाद येथे गु.र.क्र. ०४/२०१५ कलम २९५, ३४ भा.दं.वि. सह ३(१) (१०) अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्याप्रमाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून गुन्हा तपास सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील बंदरांमधील गाळ काढण्याबाबत

(१४) १८३८९ (१०-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील बंदरांमधील गाळ काढण्यासाठी सन २०१५ च्या अर्थसंकल्पात शासनाने सुमारे १ कोटी रुपये किंमतीचा ड्रेझर दिला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, 'सीएसडीस्वामी' नावाच्या या ड्रेझरने रत्नागिरी जिल्ह्यातील कोणकोणत्या बंदरांचा किती प्रमाणात गाळ काढण्यात आला आहे,

(३) असल्यास, कोटयावधी किंमतीची ड्रेझर बंद आहे हे खरे आहे काय तसेच या ड्रेझरवर देखभाल व दुरुस्तीसाठी किती खर्च करण्यात आला वा येत आहे,

(४) असल्यास, बंदरांचा गाळ काढण्यासाठी अन्य कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

तथापि, किनारपट्टीवरील गाळ उपासणीकरिता सन २०१२-१३ मध्ये शासन निधीतून दोन ड्रेझर खरेदी करणेत आलेले आहेत.

(२) कटर सक्शन ड्रेजर स्वामी मार्फत रत्नागिरी येथील मिस्करवाडा बंदरामध्ये एकूण १७९८५ घनमिटर गाळ काढण्यात आला आहे.

(३) व (४) हे खरे नाही, सदर ड्रेजर सातपाटी जि. ठाणे येथे कार्यरत आहेत. या ड्रेजरच्या देखभालीवर सन २०१४-१५ मध्ये रु. १७,७८,०००/- इतका खर्च झालेला आहे.

रत्नागिरी जिल्ह्यातील पोलीस वसाहतींच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत

(१५) १८४०७ (१२-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील पोलीस वसाहतींच्या देखभाल व दुरुस्तीसाठी २६९ लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक सन २००९ मध्ये जिल्हाप्रशासनाकडून शासनाकडे पाठविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस वसाहतींची दुरुस्ती व्हावी यासाठी निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

माणगाव तालुक्यातील (जि.रायगड) निजामपूर येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्याला लाचलुचपत विभागाने लाच स्विकारताना पकडल्याबाबत

(१६) १८९५५ (१०-०८-२०१५). श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगाव तालुक्यातील (जि.रायगड) निजामपूर येथील सुरक्षा रक्षकाचा रखडलेला पगार देण्यासाठी तीन हजाराची लाच स्विकारताना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्याला दिनांक २२ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास लाचलुचपत विभागाने पकडल्याची घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर प्राचार्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) : (१) होय.

(२) व (३) श्री.प्रविण प्रकाश सावंत, सुरक्षा रक्षक, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, माणगाव, निजामपूर यांचा दिनांक १२.११.२०१४ ते ३०.०३.२०१५ या कालावधीचा पगार देण्यासाठी प्राचार्य श्री.रामदास पगारे यांनी तक्रारदार श्री.सावंत यांचेकडे रु. ३०००/- इतकी लाचेची मागणी करुन दि. २२.०४.२०१५ रोजी लाचेची रक्कम स्विकारताना त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले. या बाबत माणगाव पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ०४/२०१५ कलम ७, १३ (१)(ड) सह १३(२), लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला असून अपचारी लोकसेवक यांचेविरुध्द मा.न्यायालयात अभियोग्य दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्यातील पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्याकरीता शासकीय निवासस्थानापासून वंचित असल्याबाबत

(१७) १९७४९ (१०-०८-२०१५). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जवळपास २ लाख २० हजार कर्मचारी व अधिकाऱ्यांपैकी जवळपास १ लाख ३३ हजार पोलीस कर्मचारी व अधिकारी शासकीय निवासस्थानापासून वंचित आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच जळगांव जिल्ह्यातील १,१०० पोलीस कर्मचा-यांकरीता केवळ ४५० निवासस्थाने उपलब्ध असल्याने इतर कर्मचा-यांना भाड्याच्या घरात रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच हिंगोली जिल्ह्यात ११०० पोलिस कर्मचा-यासाठी केवळ ४५० निवासस्थाने उपलब्ध असल्याने इतर कर्मचा-यांना भाड्याच्या घरात राहवे लागत आहे तर २७० निवासस्थांनाचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना शासकीय निवासस्थान देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) : (१) राज्यात पोलीस अधिकारी/कर्मचारी यांची एकूण ८६,५१५ निवासस्थाने उपलब्ध असून, ८०% उद्दीष्टाप्रमाणे १,७७,३४९ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता आवश्यक असणारी एकूण ९०,५३४ निवासस्थानांची आवश्यकता आहे.

(२), (३) व (४) जळगाव जिल्हा पोलीस दलाच्या आस्थापनेवरील १४५३ पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने देण्यात आलेली आहेत. जळगाव जिल्ह्यातील जळगाव पोलीस मुख्यालय येथे ९४२ निवासस्थाने त्याचप्रमाणे ५ पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना ३०९ निवासस्थाने निधीची उपलब्धता लक्षात घेऊन बांधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

हिंगोली जिल्ह्यातील पोलीस कर्मचाऱ्यांना ४५० निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यात आले असून, हिंगोली पोलीस मुख्यालय त्याचप्रमाणे ३ पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी २७० पोलीस निवासस्थाने निधीची उपलब्धता लक्षात घेऊन बांधण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

माणगांव (जि.रायगड) पोलीस ठाण्याजवळ बांधण्यात आलेल्या पोलीस वसाहतीचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे झाल्याबाबत

(१८) १९८०५ (१०-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माणगांव (जि.रायगड) पोलीस ठाण्याजवळ बांधण्यात आलेल्या पोलीस वसाहतीचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे झाले असल्याने ठेकेदार व उप अभियंता यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिनांक २९ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हा पोलीस अधिक्षकांनी दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत काय,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) : (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर कारागृहातील त्रुटीची पूर्तता करणेबाबत

(१९) २१५३९ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर कारागृहाला मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास भेट दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भेटीत कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत,
(३) तसेच सदर त्रुटीची पूर्तता करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०२-२०१६) :(१) होय.
(२) मा.मुख्यमंत्री सदर भेटीत दिलेल्या सूचना खालील प्रमाणे आहेत :-

अ) दि. ३१.३.२०१५ रोजी ५ न्यायाधीन बंद्यानी पलायन केलेल्या बडीगोल बॅरेक क्र. ६ जवळील आतील व बाहेरील तटांची पाहणी करुन तटभिंतीला शॉक व सायरन फेन्सिंग करणेबाबत संबंधितांना कळवावे.

आ) मोबाईल व पलायन दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांवर कार्यवाही करावी.

इ) कुख्यात बंद्यांना वेगळे अंडासेलमध्ये ठेवावे. तसेच त्यांचेवर विशेष लक्ष ठेवावे.

ई) कुख्यात बंद्यांना इतर कारागृहात वर्ग करावे.

उ) कारागृहातील बंदोबस्त वाढवावा.

(३) कारागृहामार्फत सदर सुचनेच्या अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

अ) राज्यातील कारागृहात बंदी पलयानाच्या व इतर अनुचित घटना रोखण्यासाठी राज्यातील सर्व कारागृहांच्या मुख्य तटभिंतीवर पॉवर फेन्सिंग यंत्रणा बसविणेबाबतचा एकत्रीत प्रस्ताव अपर पोलीस महासंचालक व कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य पुणे यांनी दिनांक १४.८.२०१५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, वरळी मुंबई यांना सादर करण्यात आला आहे. प्रस्तावात नागपूर मध्यवर्ती कारागृहसहित राज्यातील सर्व मध्यवर्ती जिल्हा कारागृहो यांचा समावेश करण्यात आला आहे.

आ) दि. ३१.३.२०१५ रोजी पाच न्यायाधीन बंद्यांनी पलायन केल्याची घटना घडल्यानंतर मुख्यालयाचे आदेशान्वये श्री.व्ही.एस.कांबळे (अधीक्षक), श्री.वैभव आत्राम (वरिष्ठ तुरुंगाधिकारी), श्री.ए.व्ही. मलवाडा (तुरुंगाधिकारी श्रेणी-१) श्री.आर.जी.पारेकर (तुरुंगाधिकारी श्रेणी-२) श्री.एस.यु.माळशिकारे (तुरुंगाधिकारी श्रेणी-२), श्री.रमेश

ढेकले (हवालदार), श्री.अशोक भांडारकर (हवालदार), श्री.संजय ठोकळ (रक्षक) व श्री मंगेश प्रजापती (रक्षक) यांना निलंबित करण्यात आले असून मोबाईल प्रकरणी श्रीकृष्ण रहाटे (रक्षक) यांना निलंबित करुन वरिष्ठांशी गैरवर्तन केल्याने बडतर्फ करण्यात आलेले आहे. तसेच मोबाईल प्रकरणात संशयीत असलेल्या १७ रक्षक सवर्गीय कर्मचाऱ्यांना पूर्व विभागातील इतर कारागृहात संलग्न करण्यात आलेले असून त्यापैकी ३ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आलेली आहे.

इ) कुख्यात व कारागृहात सुरक्षेया दृष्टीने धोकायक असलेल्या बंद्यांस अतिसुरक्षा (अंडासेल) मध्ये ठेवण्यात येते. दि. १७.९.२०१५ पर्यंत अंडासेलमध्ये १७ बंदी ठेवण्यात आले आहे. गवळी गँगचा अरुण गुलाब गवळी, लिटील सरदार गँगचा राजेंद्र सिंग लोहीया, शेखू गँगचा शेख अकरम शेख रहमान व गुलनवाज खान एजाज खान, डल्लू सरदार गॅगचा नरेंद्रसिंग नानकसिंग दिग्वा, राजागैर गँगचा राजा गौस अली वारीस आली, कासूरकर गँगचा दिलीप विठ्ठल कोसूरकर इत्यादी कुख्यात बंद्यांना अंडासेल मध्ये ठेवण्यात आलेले असून त्यांचेवर विशेष लक्ष ठेवणेबाबत ड्यूटीवरील कर्मचारी व अधिकारी यांना सुचना देण्यात आली आहे.

ई) न्यायाधीन बंद्यांना इतर कारागृहात वर्ग करण्यासाठी संबंधीत न्यायालयाची परवानगी घ्यावी लागते, पलायन केलेल्या ५ बंद्यांपैकी ४ बंद्यांना अटक करुन कारागृहात दाखल केलेले असून त्यांना इतर कारागृहात वर्ग करणेबाबत संबंधित न्यायालयास परवानगी मागितलेली आहे. त्यापैकी एका बंद्यास अकोला जिल्हा कारागृह येथे वर्ग करण्यात आलेले आहे. तसेच विरुध्द गँगच्या बंद्यांना मा.न्यायालयाच्या परवानगीने वर्ग करण्यात आलेले आहे.

उ) नागपूर कारागृहातील रक्षक संवर्गीय कर्मचाऱ्यांची बरीच पदे रिक्त असल्याने उपलब्ध कर्मचाऱ्यांमधून जास्तीत जास्त कर्मचारी सुरक्षितेकरीता नेमण्यात येत आहेत.

मुंबई डोंगरी येथील कार डिलरच्या बंद असलेल्या घरातून अज्ञात चोरटयांनी ५० लाख रुपयांचा ऐवज पळविल्याबाबत

(२०) २१५४८ (१२-०८-२०१५). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई डोंगरी येथील कार डिलरच्या बंद असलेल्या घरातून दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास अज्ञात चोरटयांनी ५० लाख रुपयांचा ऐवज पळविल्याची घटना घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार कोणती कारवाई केली वा करण्यांत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) : (१) होय.

एकूण २१,३४,०००/- रुपयांचा ऐवज चोरुन नेल्याची तक्रार डोंगरी पालिस ठाण्यात प्राप्त आहे.

(२) होय, सदर प्रकरणी डोंगरी पोलिस ठाणे गु..र.क्र. १३८/१५ लम ४५४, ४५७,२८० भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोद करण्यात आला आहे.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई जुहु येथील जेव्हीपीडीतील गृहस्वप्न या गृहनिर्माण संस्थेला म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या एफएसआय प्रकरणाच्या चौकशीचा अहवालाबाबत

(२१) २१६९७ (१२-०८-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जुहु येथील जेव्हीपीडीतील गृहस्वप्न या गृहनिर्माण संस्थेला म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या एफएसआय प्रकरणाचा चौकशीचा अहवाल दिनांक १० फेब्रुवारी, २०१५ रोजी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी सादर केला, उक्त अहवालावर पोलीस महासंचालकांनी निर्णय घ्यावा असे निर्देश मा.उच्च न्यायालयाने दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणता निर्णय घेण्यात आला वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) :(१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी मा.न्यायालयाने दिनांक १०.०२.२०१५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार प्रस्तुत प्रकरणी उघड चौकशीअंती गुन्हेगारी स्वरुपाची गैरवर्तणुक झाल्याचे दिसून येत नसल्याने उघड चौकशी बंद करण्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

राज्यातील करार पध्दतीने घेतलेल्या शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवाबाबत

(२२) २१७८३ (१२-०८-२०१५). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.जीवा गावित (कळवण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या धोरणानुसार शासकीय व निमशासकीय कार्यालयात विविध संवर्गातील पदे करार पध्दतीने (कंत्राटी) भरती करणेत आलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, करार पध्दतीने भरणेत आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा १० वर्षापेक्षा अधिक कालावधी पूर्ण झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन सेवेसाठी असलेली वयोमर्यादा सदर कर्मचाऱ्यांनी ओलांडली असल्याने त्यांना अन्यत्र सेवेची संधी उपलब्ध होणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन करारपध्दतीने भरती करणेत आलेल्या कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नोकरीत सामावून घेणार आहेत काय,

(५) नसल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या भवितव्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०१-२०१६) :(१), (२), (३) व (४) अ) विवक्षित कामांसाठी विविध क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती आणि शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना करार पध्दतीने नियुक्ती देण्याची तरतूद शासन निर्णय, दि.१५.२.१९९५ मध्ये आहे. त्याचप्रमाणे, प्रशासनावरील खर्च आटोक्यात ठेवण्यासाठी एखाद्या विशिष्ट कार्यक्रमांतर्गत वाढीव पदांची आवश्यकता असल्यास पदनिर्मिती करण्याऐवजी किंवा शासनाने कंत्राटी पध्दतीने नेमणुका करण्याऐवजी बाह्य यंत्रणेमार्फतकामे प्रस्तावित करावीत किंवा मानधनावर कामे करुन घ्यावीत. तसेच अधिकारी स्तरावरची पदनिर्मिती आवश्यक असल्यास त्यासाठी आवश्यक कर्मचारी बाह्ययंत्रणेमार्फत घेण्यात यावेत असा निर्णय शासनाने दि. २७.९.२०१० रोजी घेतला आहे. नियमित पदभरती केल्यास येणाऱ्या खर्चाच्या तुलनेत १०-२५% बचत, सदर पदे बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात आल्यास होईल याची दक्षता घेण्याच्या सूचना दि. २.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत.

ब) या धोरणानुसार तसेच प्रशासकीय निकड म्हणून राज्यातील विविध कार्यालयांमध्ये विवक्षित कामासाठी तज्ञ व्यक्तिंच्या करार पध्दतीने तसेच बाह्यस्त्रोतामार्फत कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात आल्या आहेत.

क) करार पध्दतीने देण्यात येणाऱ्या नियुक्त्या विशिष्ट कालावधीसाठी करण्यात येतात आणि आवश्यकतेनुसार त्यांना मुदतवाढा देण्यात येते. करार पध्दतीने नियुक्ती देताना अटी व शर्तीची माहिती संबंधित व्यक्तींना देण्यात येते. विवक्षित कामांसाठी तज्ञ व्यक्तिंना करार पध्दतीने आणि बाह्यस्त्रोताद्वारे कंत्राटी पध्दतीने नियुक्ती दिलेलया व्यक्तींना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे शासनाचे धोरण नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

चिखली जि.बुलडाणा येथील पोलीस वसाहत नव्याने बांधण्याबाबत

(२३) २२३२४ (१०-०८-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखली जि.बुलडाणा येथे सन १९१७ ते १९१८ च्या दरम्यान बांधकाम केलेल्या पोलिस वसाहतीमधील घराची जीर्णावस्था झाली आहे. खिडक्या तुटलेल्या आहेत. भिंतींना तडे, दरवाजे नसणे, पावसाळ्यात पाणी गळते, हे खरे आहे काय,

(२) तसेच सन २०१३ मध्ये ९१ घराच्या पोलीस वसाहतीसाठी १५० लाखाचा निधी मंजूर झाला होता तथापि प्रशासकीय मान्यता न मिळाल्याने सदर निधी परत गेला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चिखली येथील पोलीस वसाहत नव्याने बांधण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) बुलढाणा जिल्ह्यातील चिखली पोलीस स्टेशन अंतर्गत ९१ पोलीस निवासस्थाने बांधण्याबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.

सी.बी.डी.बेलापूर (नवी मुंबई) येथील पोलीस वसाहतीतील घरे मोडकळीस आल्याबाबत

(२४) २२३३७ (१०-०८-२०१५). श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सी.बी.डी.बेलापूर (नवी मुंबई) येथील पोलीस वसाहतीतील घरे मोडकळीस आलेली असून त्यांची सिडको मार्फत पुनर्बांधणी करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू पुनर्बांधणीचा प्रस्ताव गृह विभागाने तयार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१६) : (१) होय.

(२) व (३) सी.बी.डी. बेलापूर (नवीन मुंबई) येथील पोलीस निवासस्थानांची दुरुस्ती करण्याकरीता रुपये १०,४०,७१,४०६/- इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास शासन निर्णय दिनांक ०२.०९.२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

काशीमीरा पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरिक्षकास बारबालांवर पैशाची उधळण करुन नाचतांनाचे चित्रीकरण मिळाल्याबाबत

(२५) २२५३६ (१०-०८-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर घोडबंदर रोड (जि.ठाणे) येथील सीहॉक लेडीजबार मध्ये काशीमीरा पोलीस ठाणे येथील सहाय्यक पोलीस निरिक्षक याला बारबालांवर पैशाची उधळण करुन नाचतांनाचे

चित्रीकरण दिनांक १५ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात डान्सबार बंदी केली असताना सुध्दा काशीमीरा परिसरातील डान्सबार सुरु असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) दिनांक ०२.०५.२०१५ रोजी कासारवडवली पोलीस ठाण्याचे हद्दीतील चिराग (सी हॉक) बार मध्ये काशिमीरा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश पाटील हे सदर बारमधील महिला व इतर पुरुषांसोबत डान्स करताना दिसत असल्याबाबत सोशल मिडीयावर चित्रफित तसेच वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाली हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी चित्रफीत व त्या आशयाची वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाल्याने सहा. पो. आयुक्त वर्तकनगर विभाग, ठाणे यांनी सखोल चौकशी करुन अहवाल दिला आहे त्यानुसार सपोनि उमेश पाटील नेमणूक काशिमीरा पोलीस स्टेशन यांचे विरोधात यापूर्वीच पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांनी त्यांना निलंबित करुन विभागीय चौकशी आदशित केले आहे.

ठाणे पोलीस आयुक्त परिसरातील पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये डान्सबार नाहीत. तसेच वेळोवेळी बार चेकींग करुन अवैध डान्स किंवा इतर कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास त्याबाबत कठोर कारवाई केली जाते. त्याचप्रमाणे डान्सबार संबधी नागरिकांमध्ये कोणत्याही प्रकारचा संभ्रम झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील पोलीसांच्या जुन्या निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याबाबत

(२६) २२७१७ (१२-०८-२०१५). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)राज्यातील पोलीसांच्या जुन्या निवास्थानाच्या दुरुस्तीसाठी स्वतंत्र मंडळ स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्तावाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू मंडळ किती कालावधीत स्थापन होणे अपेक्षित आहे आणि त्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

नांदगांव तालुक्यातील (जि. नाशिक) नांदगाव व मनमाड येथील पोलीस स्टेशनच्या इमारती मोडकळीस आल्याबाबत

(२७) २३१३५ (१०-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव तालुक्यातील (जि. नाशिक) पोलीस स्टेशन नांदगांव व पोलीस स्टेशन मनमाड या दोन पोलीस स्टेशनच्या इमारती अत्यंत जुन्या व मोडकळीस आलेल्या व दैनंदिन कामकाजासाठी इमारती अपुर्ण पडत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदगांव व मनमाड पोलीस स्टेशनच्या अद्ययावत इमारतीचे बांधकामे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) होय.

(२) नांदगाव व मनमाड पोलीस ठाण्यातील नवीन इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जागा उपलब्ध असून, बांधकाम करण्यासाठी खर्चाचे अंदाजपत्रक व नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली येथील पोलीस वसाहतींची दुरावस्था झालेबाबत

(२८) २३३७६ (१२-०८-२०१५). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील पोलीस वसाहतींची प्रचंड दुरावस्था झाल्यामुळे पोलिसांचे व त्यांच्या कुटुंबियांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनके पोलिस कर्मचारी या दुरावस्थेमुळे खाजगी घरे भाड्याने घेऊन राहत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या वसाहतींना सर्व सोई सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) व (२) सांगली येथील पोलीस वसाहतीची दुरावस्था झाल्याने अनेक पोलीस कर्मचारी खाजगी घरे भाड्याने घेऊन राहत आहेत.

(३) सांगली येथील पोलीस वसाहतीच्या दुरुस्तीबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाशी पत्र व्यवहार करुन दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत. तसेच समस्यांचे निराकरण सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येत आहे,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

सांगली जिल्ह्यातील शिराळा येथील पोलीसांच्या निवासस्थानांची दुर्दशा

(२९) २३५५१ (१०-०८-२०१५). श्री.शिवाजीराव नाईक (शिराळा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील शिराळा येथील पोलीस वसाहतीची इमारत गेली अनेक वर्षे अत्यंत मोडकळीस आलेल्या स्थितीत असून तेथील वीज कनेक्शन तोडण्यात आली आहे, पाणी पुरवठा खंडित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनतेच्या संरक्षणासाठी अविरत कार्यरत असलेल्या पोलीसांच्या निवासस्थानाकडे दुर्लक्ष झाल्याने तेथील पोलीसांचे स्वास्थ बिघडले असून नाईलाजाने पोलीसांना खाजगी घरे घेऊन रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सांगली जिल्ह्यातील शिराळा येथील पोलीसांना निवारा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) : (१), (२) व (३) पोलीस अधीक्षक, सांगली जिल्ह्यातील शिराळा पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी निधीची उपलब्धता लक्षात घेऊन प्रशासकीय मान्यता व निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाहीकरण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

कोल्हापूर शहरामध्ये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत शासनाकडून मंजुर झालेल्या निधीतुन शहरातंर्गत ३९ रस्त्यांची कामाबाबत

(३०) २४२९१ (११-०८-२०१५). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर शहरामध्ये महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान अभियानांतर्गत शासनाकडून मंजुर झालेल्या निधीतुन शहरातंर्गत ३९ रस्त्यांची कामे घेण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामासाठी संबंधित ठेकेदारांना वेळेची मर्यादा करारातच घालून देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वेळेची कालमर्यादा संपूनही अद्याप ब-याच रस्त्यांची कामे अपूर्ण अवस्थेत असुन करण्यात आलेली कामे अत्यंत निकृष्ट पध्दतीने करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अपुर्ण असलेली कामे तात्काळ करुन घेणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१६) :(१) होय.
(२) होय.
(३) रस्त्यांची कामे अपुर्ण अवस्थेत आहेत हे खरे आहे. परंतू कामे निकृष्ट पध्दतीने करण्यात आली आहेत हे खरे नाही. कारण सदर कामावर तांत्रिक सल्लागार कंपनी कोल्हापूर महानगरपालिकांमार्फत नेमली असून, सदरच्या कामाच्या गुणवत्ते बाबतच्या व बांधकाम साहित्या बाबतच्या चाचण्या सल्लागार कंपनी प्रतिनिधी मार्फत वेळोवेळी क्षेत्रीय प्रयोगशाळा व शासकीय प्रयोगशाळेमध्ये केल्या जातात.
(४) व (५) सद्या सर्व रस्त्यांची कामे चालू आहेत, ही कामे दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

ओरस (जि.सिंधुदुर्ग) येथील पत्रकार भवनाच्या बांधकामाबाबत

(३१) २४६३७ (१२-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ओरस (जि.सिंधुदुर्ग) येथे पत्रकार भवनाच्या बांधकामासाठी मा.मुख्यमंत्री निधीतून ४५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पत्रकार भवनासाठी ओरसमध्ये कोणत्या ठिकाणी किती जमिन संपादित करण्यात आली आहे व बांधकामास किती कालावधीत सुरुवात करण्यात येणार आहे,
(३) अद्याप पत्रकार भवनासाठी आवश्यक त्या कार्यवाहीस सुरुवात झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२९-०१-२०१६) :(१), (२) व (३) "सिंधुदुर्ग जिल्हा मराठी पत्रकार संघ" या नोंदणीकृत संस्थेने 'सिंधुदुर्ग नवनगर विकास प्राधिकारणाकडून' स्वत:च्या नावे भूखंड खाजगीरित्या विकत घेतला आहे. अद्यापपर्यंत मुख्यमंत्री निधी किंवा शासनाकडून कोणत्याही स्वरुपाचा निधी देण्यात आलेला नाही.

पनवेल तालुकयातील (जि.रायगड) पळस्पे ग्रामपंचायत हद्दीत असलेलया जेडब्ल्यूसी कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करण्याबाबत

(३२) २४७४८ (१२-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) पळस्पे ग्रामपंचायत हद्दीत असलेल्या जेडब्ल्यूसी कंपनीने दोन वर्षाची थकविलेली घरपट्टी ग्रामपंचायतीला अदा करावी, अशी मागणी सरपंच,

उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांनी केली असता त्यांना शिवीगाळ व दमदाटी करणा-या कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करावे याकरिता दिनांक २ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास पोलिस आयुक्तालयासोर बेमुदत उपोषण केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) : (१) व (२) सदर प्रकरणी अर्जदार व गैरअर्जदरार यांचेसंदर्भात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. सदर अर्जाची चौकशी करुन अर्जदार व गैरअर्जदार यांच्यात आपआपसात समझोता झाल्याने अर्ज "दफ्तरी फाईल" करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

आर्णी-केळापूर मतदार संघातील पांढरकवडा येथे नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्रांचे बांधकाम होण्याबाबत

(३३) २५२५५ (१९-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्णी-केळापूर मतदार संघातील पांढरकवडा येथील १००० क्षमतेचे नवीन प्रशिक्षण केंद्रांचे बांधकाम मंजूर असून सदरील कामाकरिता ५८.६६ कोटी निधीस प्रशासकीय मान्यताही प्राप्त झालेली असताना अद्यापही कामास सुरुवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम तातडीने होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.मुख्यमंत्र्यांना दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्यानुसार नवीन पोलीस प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१६) :(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) पांढरकवाडा, जिल्हा यवतमाळ येथे नवीन १०० प्रशिक्षणाची क्षमता असलेल्या पोलीस प्रशिक्षण केंद्राचे बांधकाम निधीची उपलब्धता लक्षात घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

दर्यापूर (जि. अमरावती) मधील रहिमापूर पोलीस ठाण्यातील हद्दीतील अवैध दारु जप्त केल्याबाबत

(३४) २६०५० (१२-०८-२०१६). श्री.रमेश बुंदीले (दर्यापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दर्यापूर (जि. अमरावती) रहिमापूर पोलीस ठाण्यातील हद्दीतील अवैध दारु अड्यावर धाड टाकून १७५ दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या परंतु आरोपी फरार झाल्याचे दिनांक १८ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध दारु विक्रेत्यावर तसेच आरोपी फरार झाल्यासंदर्भात संबधीत पोलीसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) : (१) दर्यापूर (जि.अमरावती) रहिमापूर पोलीस ठाणे हद्दीतील चिंचोली (बु.) येथील श्री.अरुण घोगरे यांच्या घरी दिनांक १४/०३/२०१५ रोजी टाकलेल्या धाडीत ११९ देशी दारुच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या, सदर प्रकरणी दोन आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन, रहिमापूर येथे गु.र.क्र. ६०१३/१५ मु.दा. कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) या प्रकरणी एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. या प्रकरणी आरोपी पोलीसांच्या ताब्यातून किंवा अटकेतून पळून गेलेला नाही. त्यामुळे पोलीसांवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील रायपुर येथे तळेगाव दाभाडे पॅटर्नने जमीन शासकीय महसूली दस्ताऐवजात नोंद करण्याबाबत

(३५) २६४६३ (१०-०८-२०१५). श्री.समिर मेघे (हिंगणा) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील रायपुर येथे तळेगाव दाभाडे पॅटर्न व अकृषक जमिनीतील (सर्व्हे नं.८०/१.८०/३.८१/४.८१/२.९१/३.९६/१) आदेशान्वये शासनास विनामुल्य प्रदान केलेल्या जमीनीवर जमीनमालक मोठ्या प्रमाणात बांधकाम करत असल्याने त्यांच्यावर कारवाई करुन सदर जमीन शासकीय महसूली दस्ताऐवजात नोंद करण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांच्याकडे जिल्हास्तरावरुन प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू जमीनीचे महसूल दस्तऐवजामध्ये १९९४ पासून नोंद झलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनास विनामुल्य प्रदान केलेली जमीन व सार्वजनिक उपयोगाच्या जमीनीवर बांधकाम करणा-या जमीन मालकावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१६) :(१) नाही.
(२) नाही.
(३) हिंगणा (जि.नागपूर) तालुक्यातील रायपुर येथे मळेगांव दाभाडे पॅटर्न व अकृषक जमिनीतील (सर्व्हे नं ८०/१.८०/३.८१/४.८१/२.९१/३.९६/१) जागेवर बांधकाम करण्यात आले नसल्याने कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

अवैध वाळू वाहतुकीसह अनधिकृत स्टोन क्रशिंग धान्य साठवणूक करणारे स्वस्त धान्य दुकानदार यांच्यावर कारवाई करण्याबात

(३६) २८३३४ (२३-१२-२०१५). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अवैध वाळू वाहतुकीसह अनधिकृत स्टोन क्रशिंग धान्य साठवणूक करणारे स्वस्त धान्य दुकानदार यांच्याविरुध्द एमपीडीए अन्वये कारवाई केली जाणार असल्याचे मा.महसूल मंत्री यांनी एका पत्रकार परिषदेत दिली आहे हे खरे आहे काय
(२) असल्यास त्याची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे
(३) असल्यास आतापर्यंत किती अवैध वाळू वाहतुकीसह दोषी असणा-या स्वस्त धान्य दुकानदार यांच्याविरुध्द कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०२-२०१६) : (१) याबाबतची माहिती या विभागात उपलब्ध नाही.
(२), (३) व (४) महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, हातभट्टीवाले, औषधिद्रव्ये विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती व दृकश्राव्य, कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणाऱ्या व्यक्ती (व्हिडीओ पायरेटस) यांच्या विघातक कृत्यांना आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (एमपीडीए ॲक्ट-१९८१) च्या कक्षेत वाळू तस्कर व अत्यावश्यक वस्तूंचा काळा बाजार करणारी व्यक्ति यांना आणण्यासाठी सदर अधिनियमात सुधारणा करणाऱ्या अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्यासाठी हिवाळी अधिवेशनात मंजूर करण्यात आलेल्या विधेयकास मा.राष्ट्रपती महोदयांनी दि. २२/०१/२०१६ रोजी मंजूरी दिली आहे. त्यानुसार कारवाई करण्याच्या सूचना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना दि. २५/१०/२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या वर्ग ३ आणि ४ च्या स्पर्धा परीक्षा ऑन लाईन न घेण्याबाबत

(३७) २८९०२ (२३-१२-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या वर्ग ३ व वर्ग ४ च्या स्पर्धा परीक्षा ऑन लाईन न घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनीधी अचलपूर यांनी दिनांक १३ ऑगस्ट, २०१५ रोजी शासनास पत्र लिहून मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास ऑन लाईन परीक्षेमुळे संबंधित विद्यार्थ्यांना त्रास होवून हे परीक्षार्थी त्यांना मिळणाऱ्या नोकरीपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०२-२०१६) :(१) होय.

(२) सन २०१५ हे वर्ष संगणकीय कालमार्यादित सेवा वर्ष म्हणून घोषित करण्यात आले असल्याने या वर्षापासून शासकीय कार्यालयांनी जपतेस इलेक्ट्रॉनिक माध्यमातून सेवा उपलब्ध करावयाच्या आहेत. या अनुषंगाने शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग दि. ११/०३/२०१५ रोजी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट - क व गट - ब (अराजपत्रित) पदे सरळसेवेने भरताना उमेदवारांकडून स्पर्धा परीक्षांचे अर्ज व परीक्षा शुल्क स्विकारणे, उमेदरावारांना परीक्षेचे प्रवेशपत्र तयार करुन देणे, शिफारस पात्र उमेदवारांच्या याद्या प्रसिध्द करणे इ. अनुषंगिक कामे ऑनलाईन पध्दतीने पार पाडण्याच्या सूचना संबंधित निवड समित्यांना देण्यात आल्या आहेत. मात्र घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षा पूर्वीप्रमाणेच जिल्हानिहाय पारंपारिक स्वरुपाच्या लेखी परीक्षा असणार आहेत. उमेदवारांना स्वर्धा परीक्षा ऑनलाईन पध्दतीने द्याव्या लागतील असा कोणताही निर्णय शासनाने घेतला नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

विरार (ता.वसई, जि.पालघर) येथे एका पत्रकारासह त्याच्या दोन भावांना केलेली मारहाण

(३८) २९७४१ (२१-०१-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विरार (ता.वसई, जि.पालघर) येथे महापुरुषाबदल अवमानकारक अपशब्द उच्चारल्याचा जाब विचारल्याने एका पत्रकारासह त्याच्या दोन भावांवर ३०-४० जणांच्या जमावाने काठी, लोखंडी रॉडने बेदम मारहाण करुन प्राणघातक हल्ला केल्याची घटना, दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) होय.

(२) सदर प्रकरणी विरार पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ६९६/२०१५ भादिवसं कलम ३२६, १४३, १४७, १४९, २९५ (३) अ.जा.ज. कायदा कलम ३ (१)(३)(१०) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी ६५ आरोपींपैकी ४ आरोपीना अटक करुन न्यायालयीन कोठडी मंजूर केली आहे. २ आरोपींनी मा.अपर जिल्हा व सत्र न्यायालय वसई यांचेकडून अटकपूर्व जामिन मिळविला आहे. सध्या सर्व आरोपी जामिनावर आहेत. गुन्ह्यातील अटक आरोपी व अनोळखी २५-३० आरोपीविरुध्द मा. न्यायालयात जा.क्र. १२५४०/२०१५ अन्वये दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

अकोला व बुलडाणा जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिक पेन्शन योजनेपासून वंचित असल्याबाबत

(३९) २९८०९ (२१-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी सर्व कागदपत्रासह जिल्हाधिकारी यांचे शिफारशीचे स्वातंत्र्य सैनिक पेन्शन योजनेचा प्रस्ताव गत ८ ते ९ वर्षापासून शासनाकडे सादर केलेले आहे, तरीही स्वातंत्र्य सैनिक पेन्शन योजना सुरु झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विशेषत: अकोला व बुलडाणा जिल्हयातील स्वातंत्र्य सैनिक पेन्शन योजनेपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत स्वातंत्र्य सैनिक पेन्शन योजना सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१६) : (१) हे खरे नाही.

स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन देण्याची योजना सन १९६५ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. स्वातंत्र्य सैनिक गौरव पेन्शन मिळण्यासाठी शासनाकडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावाची शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या निकषांनुसार छाननी करण्यात येते व त्यानुसार स्वातंत्र्य सैनिक गौरव पेन्शन मंजूर करण्याबाबत अथवा नामंजूर करण्याबाबत सैनिक उच्चाधिकार समिती निर्णय घेते.

(२) हे खरे नाही. सद्यस्थितीत अकोला जिल्ह्यात १४६ टक्के स्वातंत्र्यसैनिक तर बुलढाणा जिल्ह्यात ५७ इतके स्वातंत्र्यसैनिक निवृत्तीवेतन घेत आहेत.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एका अपात्र उमेदवाराची निवड केल्याबाबत

(४०) २९८९१ (२१-०१-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत नोकरीसाठी अर्ज केलेल्या उमेदवाराने शैक्षणिक अर्हता आणि कामाचा अनुभव याविषयी दिलेले माहिती असत्य असूनही त्याकडे दुर्लक्ष करुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एका अपात्र उमेदवाराची निवड करुन त्यास राज्य शासनामध्ये नोकरीही मिळाली, अशी माहिती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मॅट) एका प्रकरणात माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीअंती अपात्र उमेदवाराची निवड करणाऱ्या संबंधितावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१६) :(१), (२) व (३) भाषा अधिकारी (हिंदी), भाषा संचालनालय, गट-ब या पदावरील (आगामास-१) (जाहिरातीचा दिनांक ८.९.२०११) श्री.गवई यांच्या नियुक्ती संदर्भात श्री.पोवारा यांनी शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासंदर्भात आक्षेप घेऊन मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे मूळ अर्ज क्र ६८०/२०१३ दाखल केला. सदर प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने दिनांक १७.८.२०१५ च्या निर्णयान्वये "श्री.गवई यांच्या शैक्षणिक अर्हता व अनुभवाच्या प्रमाणपत्रासंदर्भात काही निरीक्षण नोंदवून सदर पदासाठी श्री.पोवार पात्र ठरत असतील तर त्यांना ३ महिन्यात नेमणूक देण्यात यावी" असे आदेश दिले, तथापि, श्री.पोवार यांना मुलाखतीमध्ये किमान आवश्यक असलेल्या ४१ गुणांपेक्षा कमी गुण मिळाल्यामुळे त्यांची शिफारस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने केली नाही. मा. न्यायाधिकरणाच्या उक्त निर्णयातील निरीक्षणाच्या अनुषंगाने मराठी भाषा विभागाने उमेदावाराच्या शैक्षणिक व अनुभवाच्या अर्हतेसंबंधात संबंधित विद्यापीठ तसेच संस्थांकडून शहानिशा केली असून श्री.गवई यांची नियुक्तीची केलेली कार्यवाही योग्य होती, असे निदर्शनास आले आहे. सदरहू बाब मा. न्यायाधिकरणाच्या निदर्शनास आणण्याची मुख्य सादरकर्ता अधिकारी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांना विनंती करण्यात आली आहे

इंदापूर (जि. पुणे) तहसिलदारांच्या जीपला बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकने धडक देवून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत

(४१) २९९२३ (२१-०१-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) इंदापूर (जि. पुणे) तहसिलदारांच्या जीपला बेकायदेशीर वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रकने धडक देवून जीवे मारण्याचा प्रयत्न केला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) होय.

(२) सदर प्रकरणी भिगवण पोलीस स्टेशन भाग ५ गु.र.नं १२६/२०१५ भादवि कलम ३७९, ३५३, ४२७, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी २ आरोपींना अटक केली असून सदर आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील सर्व किल्ल्यांचा विकास करण्याबाबत निधीची तरतूद करण्याबाबत

(४२) ३१०७८ (२१-१२-२०१५). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.आऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव - पाथर्डी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील इतिहासाचे साक्षीदार असलेले काही किल्ले भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या किल्ल्यांवर पर्यटनाच्या दृष्टिने सोयीसुविधा देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला परंतू त्यावर अंतिम निर्णय होऊ शकला नसल्यामुळे राज्यातील किल्ल्यांचा विकास रखडला असल्याने पर्यटकांना किल्ल्यांवरील मुलभूत सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याचे माहे सप्टेंबर-२०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सामंजस्य कराराला भारतीय पुरातत्व विभागाकडून मंजूरी मिळून राज्याच्या व पुरातत्व विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या राज्यातील सर्व किल्ल्यांचा विकास करण्यासाठी भरीव निधीची तरतूद करून सदर किल्ल्यांचा विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) :(१) होय, हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) राज्यातील किल्ल्यांचे जतन व संवर्धन तसेच पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा निर्माण करण्याकरीता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ व भारतीय पुरातत्व विभाग, यांच्यात सांमजस्य करार करण्याकरीता भारतीय पुरातत्व विभाग नवी दिल्ली यांना दि. १२/१/२०१५ रोजीच्या पत्रान्वये अंतिम सामंजस्य कराराचा मसुदा सादर करण्यात आला असून त्याबाबत दि. १४/८/२०१५ रोजीच्या पत्रान्वये सामंजस्व करारावर स्वाक्षरी करण्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच त्याबाबत केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. सामंजस्य करारास मान्यता देण्याची बाब भारत सरकारच्या अधिकार कक्षेतील आहे.

अमरावती जिल्ह्यातील दोन वाळु माफियांनी तहसिलदारांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना मारण्याचा प्रयत्न केल्याबाबत

(४३) ३१८४९ (२१-०१-२०१६). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील दोन वाळु माफियांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत तहसिलदारांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना मारण्याचा प्रयत्न माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात केला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर वाळु माफीयावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) होय.
(२) चौकशीत गुन्ह्यातील दोन आरोपींविरुध्द पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा, अमरावती येथे दि. २८/०८/२०१५ गु.र.नं. ३४५/२०१५ भा.द.वि. कलम ३५३, २९४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्यातील दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यातील तपास पुर्ण करण्यात आला असून आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन आणि विकास) कायदा २०१२ हा रद्द करण्याबाबत

(४४) ३२७३८ (२१-०१-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन आणि विकास) कायदा २०१२ रद्द करण्याची शिफारस केंद्र शासनाच्या प्रस्तावित कायद्यासाठी रिअल इस्टेट (नियमन आणि विकास) विधेयक २०१३ संसदीय निवड समितीने सखोल अभ्यासाअंती केल्याचे राज्य शासनास केंद्र शासनाने कळविले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश महेता (२४-०२-२०१६) :(१) केंद्र शासनाच्या रिअल इस्टेट (रेग्युलेशन ॲन्ड डेव्हलपमेंट) विधेयक, २०१३ संदर्भात राज्यसभा सदस्यांच्या प्रवर समितीने दि. ३० जुलै, २०१५ रोजी राज्यसभेत सादर केलेल्या अहवालातील प्रारुप विधेयकातील कलम ९२ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण (नियोजन व विकास) अधिनियम, २०१२ वगळण्याची तरतूद प्रस्तावित केलेली आहे.

(२) व (३) अद्याप केंद्र शासनाच्या रिअल इस्टेट (रेग्युलेशन ॲण्ड डेव्हलपमेंट) विधेयकास अंतिम मंजूरी मिळालेली नसल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

अकोट (जि.अकोला) शहरात वाहतूक पोलिसाच्या दमदाटीमुळे ऑटो रिक्शा चालकाने विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याबाबत

(४५) ३५१३० (२१-०१-२०१६). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोट (जि.अकोला) शहरात वाहतूक पोलिसाच्या दमदाटीमुळे ऑटो रिक्शा चालकाने विष प्राशन करुन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडल्याचे सप्टेंबर, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू चालकावर अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात उपचार सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय व त्यानुसार दोषी वाहतूक पोलिसावर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) हे खरे नाही.

(२) व (३) सदर प्रकरणी केलेल्या चौकशीनुसार दि. २५.०९.२०१५ रोजी ऑटो चालकाने पोट दुखत असल्याने घरातील पोटदुखण्याचे औषध समजून नजर चुकीने दुसरेच औषध घेतले,

त्यामुळे तब्येत खराब झाल्या कारणारे सर्वोपचार रुग्णालयात नातेवाईकांनी भरती केले. अकोट शहरात वाहतूक पोलिसांच्या दमदाटीमुळे आत्महत्येची घटना घडल्याबाबत अकोट पोलीस स्टेशन येथे कोणतीही तक्रार दाखल नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वेळापूर (ता. माळशिरस जि. सोलापूर) येथील किराणा व्यापारी किरण पांडुरंग जवंजाळ यांनी आत्महत्या केल्याबाबत

(४६) ३५७७९ (२३-०२-२०१६). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वेळापूर (ता. माळशिरस जि. सोलापूर) येथील किराणा व्यापारी किरण पांडुरंग जवंजाळ यांनी दिनांक १० ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या बाबत चौकशी कण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) होय.
(२) सदर प्रकरणी दि १०/१०/२०१५ रोजी वेळापूर पोलीस ठाणे येथे अ.म.नं.२९/२०१५ सी.आर.पी.सी. १७४ प्रमाणे नोंद दाखल आहे. मयताचे पोस्ट मॉर्टेम करण्यात आले असून मयतास गळफास घेतल्याने मृत्यु आलेबाबत वैद्यकीय अधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अनुकंपा व प्रकल्पाग्रस्तासाठी नोकरी ऐवजी एक रकमी आर्थिक मदत देण्याबाबत

(४७) ३५९६२ (२१-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुकंपा व प्रकल्पाग्रस्तासाठी नोकरी ऐवजी एकरकमी आर्थिक मदत देण्याचा 'गुजरात पॅटर्न' राबविणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) तसेच उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१५) : (१), (२), (३) व (४) राज्यातील राज्य शासकीय,निमशासकीय, महामंडळातील अधिकारी/कर्मचारी यांच्यासाठी अनुकंपा धोरण सुधारणे आणि त्याचबरोबर प्रकल्पग्रस्तांना शासकीय नोकऱ्यांमध्ये भरती करण्यासंबंधी आढावा घेणे व त्या अनुषंगाने प्रभावी उपाययोजना सुचविण्यासाठी मा. वित्त मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०.०६.२०१५ रोजी मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर मंत्रीमंडळ उपसमितीने अद्याप अहवाल सादर केलेली नाही .

पुसद शहर पोलीस स्टेशन (जि.यवतमाळ) येथील पोलीसांनी ज्येष्ठ पत्रकारास मारहाण केल्याबाबत

(४८) ३७९५० (२१-०१-२०१६). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसद शहर पोलीस स्टेशन (जि.यवतमाळ) येथील पोलीस उपनिरीक्षक श्री.सचिन ढोके व पोलीस शिपाई कृणाल मुंडीकार यांनी दिनांक ३ जुलै, २०१५ चे सुमारास कोणताही गुन्हा नसतांना अर्वाच्य शिवीगाळ करुन पत्रकार श्री.पंजाबराव देशमुख यांना जबर मारहाण केल्याची तक्रार उप विभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांना दिनांक ६ जुलै, २०१५ व १० जुलै, २०१५ चे सुमारास जिल्हाधिकारी यवतमाळ व पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांना दिनांक १६ जुलै, २०१५ चे सुमारास मा.गृहराज्य मंत्री (ग्रामीण), मा.गृह राज्य मंत्री (शहर) पोलीस महानिरीक्षक, म.रा.मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना पंजाबराव देशमुख व लोकप्रतिनिधीं यांनी तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित कर्मचाऱ्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच श्री.सचिन ढोके, उप निरीक्षक हे पुसद, दिग्रस व उमरखेड येथे असतांना त्यांच्या अनेक तक्रारी झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०२-२०१६) :(१) होय.

(२) हे खरे नाही. सदर प्रकरणी पंजाबराव देशमुख यांनी दिलेल्या तक्रार अर्जाची चौकशी करण्यात आलेली असून चौकशीत पोलीस उपनिरिक्षक व पोलीस शिपाई यांनी प्रथमदृष्ट्या आपले कर्तव्यात कसूर केल्याचे आढळून आल्याने त्यांचे विरुध्द विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली आहे.

(३) व (४) हे खरे नाही. तथापि, पुसद येथील प्रकरणी त्यांच्यावर विभागीय चौकशी आदेशीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

दापचरी नाका (जि.पालघर) अवजड वाहने पार्किंग करणाऱ्या टोळीने पोलिस उपनिरीक्षक मुल्ला यांच्यावर केलेल्या हल्याबाबत

(४९) ३८१५० (२१-०१-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील दापचरी नाक्यावर अवजड वाहने पार्किंग करणाऱ्या टोळीने उपनिरीक्षक मुल्ला यांच्यावर दिनांक २४ सप्टेंबर, २०१४ रोजी खुनी हल्ला केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी आरोपींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०२-२०१६) :(१) होय.

(२) सदर प्रकरणी तलासरी पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्र. १५०/२०१५ भादविसं कलम ३०७, १२०(ब), १०९, ३५३, ३३२, ३४१, १४३, १४७, १४८, १४९, ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याप्रकरणी ५ आरोपींना अटक केली असून त्यांना न्यायालयीन कोठडी मंजूर केली होती. सध्या आरोपी दि. ५/०१/२०१६ रोजी जामिनावर सुटलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे जिल्हा न्यायालयाचा महत्वाचा विभाग असलेल्या कौटुंबिक न्यायालयाची इमारत अपूर्णावस्थेत असल्याबाबत

(५०) ३८३९९ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हा न्यायालयाचा महत्वाचा विभाग असलेल्या कौटुंबिक न्यायालयाची इमारत अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधीअभावी अपूर्णावस्थेत असलेल्या कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीचे काम पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस (११-०२-२०१६) : (१) होय.

(२) शिवाजीनगर, पुणे येथील कौटुंबिक न्यायालयाच्या इमारतीच्या बांधकामामध्ये नकाशे व संकल्पचित्र यामधील मोठ्या बदलामुळे व काही अपरिहार्य कारणांमुळे विलंब झालेला आहे. माहे मार्च २०१५ अखेरपर्यंत या इमारतीमध्ये मुख्य बांधकाम पूर्ण झालेले आहे. या नवीन जागेत कौटुंबिक न्यायालय स्थलांतरीत करण्याकरीता फर्निचर व इतर संकीर्ण बाबींची

आवश्यकता आहे. सदर इमारीच्या बांध्कामाचा रु १६.६८ कोटी इतक्या अंदाजित खर्चाचा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला असून, त्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याचीकार्यवाही करण्यात येत आहे. सदर इमारतीचे बांधकाम त्वरित पूर्ण करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन :
मुंबई.

डॉ. अनंत कळसे
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.